मूळ



# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)**

**सभा व दप्तर कक्ष**

---

ज्ञानगंगा घरोघरी

## नियोजन मंडळ बैठक

## कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| बैठक क्रमांक | : | 47 |
| स्थळ | : | **प्रशासकीय इमारत विद्यापीठ सभागृह (Offline/Online)** |
| दिनांक | : | सोमवार, 29 डिसेंबर 2025 |
| वेळ | : | सकाळी 10 : 30 वाजता |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

---

## 47वी नियोजन मंडळ बैठक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या नियोजन मंडळाची 47 वी बैठक (ऑनलाईन व ऑफलाईन) पद्धतीने सोमवार, दि. 29 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 10.30 वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस पुढील सदस्य उपस्थित होते. वेगवेगळ्या विद्याशाखांचे विषय नियोजन मंडळापुढे सादर करताना संबंधित विद्याशाखांचे संचालक नियोजन मंडळाच्या सभेत मा. कुलगुरुंच्या निर्देशानुसार सभेत निमंत्रित सदस्य म्हणून निमंत्रित करण्यात आले होते.

| | | |
|---|---|---|
| 01 | मा. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ | अध्यक्ष |
| 02 | डॉ. अरविंद चौधरी, जळगाव | सदस्य ऑनलाईन उपस्थित |
| 03 | डॉ. प्रा. वाणी लातूरकर, लातूर | सदस्य ऑनलाईन उपस्थित |
| 04 | डॉ. काकासाहेब मोहिते, पुणे | सदस्य ऑनलाईन उपस्थित |
| 05 | डॉ. मधुकर शेवाळे, संचालक, अंतर्गत गुणवत्ता व आश्वासन कक्ष आणि नियोजन व सुसुत्रीकरण केंद्र | सदस्य |
| 06 | मा. डॉ. संजीवनी महाले, संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा | निमंत्रित सदस्य |
| 07 | मा. डॉ. माधुरी सोनवणे, संचालक, कृषी विज्ञान विद्याशाखा | निमंत्रित सदस्य |
| 08 | मा. डॉ. चेतना कामळसकर, संचालक, विज्ञान विद्याशाखा | निमंत्रित सदस्य |
| 09 | मा. श्री. माधव पळशीकर, संचालक, संगणक विद्याशाखा | निमंत्रित सदस्य |
| 10 | मा. डॉ. रश्मी रानडे, संचालक (प्र), आरोग्य विज्ञान विद्याशाखा | निमंत्रित सदस्य |
| 11 | श्री. कैलास मोरे, संचालक, ग्रामीण विकास उद्योजकता विद्याशाखा | निमंत्रित सदस्य |
| 12 | मा. डॉ. सज्जन थूल, संचालक, मूल्यमापन केंद्र | निमंत्रित सदस्य |
| 13 | मा. श्री. भटुप्रसाद पाटील, परीक्षा नियंत्रक | निमंत्रित सदस्य |
| 14 | मा. मा. डॉ. गोविंद कतलाकुटे, वित्त अधिकारी, वित्त विभाग आणि कुलसचिव (प्र.) | सदस्य-सचिव |

पुढील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 01 | मा. श्री. दत्तात्रय व्ही. जाधव, टेक्निकल एज्युकेशन, पुणे | सदस्य |
| 02 | मा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, मा. प्र-कुलगुरू आणि संचालक, बहुविद्याशाखीय विद्याशाखा | सदस्य |
| 03 | मा. डॉ. जयदीप निकम, संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा आणि मा. संचालक, व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य विकास विद्याशाखा | सदस्य |
| 04 | डॉ. राम ठाकर, सहयोगी प्राध्यापक, निरंतर शिक्षण विद्याशाखा | सदस्य |
| 05 | श्री. नरेंद्र जोशी, परभणी | सदस्य |
| 06 | मा. डॉ. नागार्जुन वाडेकर, संचालक, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा आणि संचालक, भाषा साहित्य व सांस्कृतिक अभ्यास विद्याशाखा | निमंत्रित सदस्य |
| 07 | मा. डॉ. सुरेंद्र पाटोळे, संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | निमंत्रित सदस्य |
| 08 | मा. लोखंडे, संचालक, ऑनलाईन एज्युकेशन विद्याशाखा | निमंत्रित सदस्य |
| 09 | डॉ. प्रकाश देशमुख, संचालक, विद्यार्थी सेवा विभाग | निमंत्रित सदस्य |
| 09 | मा. डॉ. दयाराम पवार, प्रमुख विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्र | निमंत्रित सदस्य |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

47 वी नियोजन मंडळ बैठक

## कार्यवृत्त

सोमवार, 29 डिसेंबर 2025 सकाळी 10 : 30 वाजता

| विषय क्रमांक | | तपशील |
|---|---|---|
| 47.1.0 | | **बैठकीसाठी ऑनलाईन\ऑफलाईन असलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांचे कुलसचिव तथा सचिव डॉ. गोविंद कतलाकुटे यांनी स्वागत केले.** |
| | | सभेच्या सुरुवातीला मा. नियोजन मंडळासाठी नवनिर्वाचित असलेले सदस्य डॉ. काकासाहेब मोहिते यांनी या मंडळाच्या कार्यकक्षेविषयी माहिती मिळावी अशी विनंती केली.<br>1. मा. कुलगुरूंनी यावर नियोजन मंडळात चर्चेला येणारे विषय आणि नियोजन मंडळाची कार्यकक्षा याविषयी अवगत करून दिले. विद्यापीठात सुरू करण्यात येणाऱ्या पदवी शिक्षणक्रमांना दूरशिक्षण परिषदेची मान्यता घेणे अनिवार्य असते. त्यासाठी दूरशिक्षण परिषदेत सादर करावयाचे प्रस्ताव नियोजन मंडळाद्वारे मान्य करण्यात येतात. नियोजन मंडळाच्या मान्यतेनंतर सदर प्रस्ताव मान्यतेसाठी दूरशिक्षण परिषदेकडे पाठविण्यात येतात. तसेच विद्यापीठाचा Prospective Plan, शिक्षणक्रमांचे ABCD, PPF, PDF and PPR Forms नियोजन मंडळात सादर केले जातात.<br>2. नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. अरविंद चौधरी यांनी विद्यापीठाचा सध्याचा विद्यार्थी व कर्मचारी Ratio बाबत विचारणा केली. त्यावर मा. कुलगुरूंनी या शैक्षणिक वर्षात 40 अभ्यासकेंद्रांवर नियमबाह्य कामकाज सुरू असल्याने त्या अभ्यासकेंद्रांची मान्यता विद्यापीठाने रद्द केली. त्यात विद्यापीठाला सुमारे 40,000 विद्यार्थी संख्येत घट झाली. तरीही शैक्षणिक गुणवत्ता टिकविण्यासाठी विद्यापीठाने हे पाऊल उचलले. त्यामुळे या शैक्षणिक वर्षात 3,74,000 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. सध्या सर्व विद्याशाखा मिळून नियमित 16 शिक्षक असून 63 शिक्षकांची करारावर नियुक्ती केली आहे. नवीन 5 विद्याशाखांची निर्मिती केल्यामुळे एकूण 13 विद्याशाखा कार्यरत आहेत. त्यासाठी नवीन पदांच्या समावेशासह शिक्षक व शिक्षकेतर पदांचा आकृतीबंध शासनाकडे पाठविण्यात आला आहे. त्याला लवकरच मान्यता मिळेल. त्यानंतर नियमित नियुक्तीची प्रक्रिया राबविण्यात येईल असे अवगत करून दिले. |
| 47.2.0 | 47.2.1 | **दि. 29 जुलै 2025 रोजी आयोजित नियोजन मंडळाची बैठक तसेच 11 ऑगस्ट 2025 रोजीच्या नियोजन मंडळ पुरवणी बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.**<br>**ठराव** – दि. 29 जुलै 2025 रोजी आयोजित नियोजन मंडळाची बैठक तसेच 11 ऑगस्ट 2025 रोजीच्या नियोजन मंडळ पुरवणी बैठकीचे कार्यवृत्त सदस्य सचिव |

| | | |
|---|---|---|
| | | डॉ. गोविंद कतलाकुटे यांनी वाचून दाखविले. त्यास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 47.2.2 | **दि. 29 जुलै 2025 रोजी आयोजित नियोजन मंडळाची बैठक तसेच 11 ऑगस्ट 2025 रोजीच्या नियोजन मंडळ पुरवणी बैठकीच्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणे.**<br>**ठराव** — दि. 29 जुलै 2025 रोजी आयोजित नियोजन मंडळाची बैठक तसेच 11 ऑगस्ट 2025 रोजीच्या नियोजन मंडळ पुरवणी बैठक कार्यवाहीच्या अहवालाचे सदस्य सचिवांनी वाचून अवगत करून दिले. त्यास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |
| 47.3.0 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 47.3.1<br>विज्ञान विद्याशाखा | **मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा आणि सर्व विद्याशाखा तसेच विद्यार्थी सेवा विभाग यांच्या सद्यस्थितीतील अभ्यासकेंद्रे आणि नव्याने देण्यात येणाऱ्या अभ्यासकेंद्रांच्या धोरणविषयीचा प्रस्ताव मा. नियोजन मंडळासमोर सादर...**<br>**टिपणी** — 27/09/2025च्या प्राप्त अहवालानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निकषांचे पालन करण्याच्या संदर्भात विज्ञान विद्याशाखेच्या बाबतीत जे निकष लावण्याचे वृतांकन केले आहे. त्यातील "विज्ञान विद्याशाखेच्या बी.एस्सी. फिजिक्सच्या अभ्यासक्रमाला बी.एस्सी. गणित तसेच बी.एस्सी. बायोलॉजी दिल्यानंतर त्यांच्याबरोबर बी.एस्सी. बॉटनी, झूलॉजी इत्यादी अभ्यासक्रम देता येतील" यावर असे मत मांडत आहोत की, विज्ञान विद्याशाखेच्या अंतर्गत असलेल्या विषयांकरिता प्रत्येक स्वतंत्र विषयांसाठी त्यातील स्पेशलायझेशन असलेले समंत्रक व त्या विषयाची प्रयोगशाळा हा महत्वाचा भाग आहे. कारण हे समंत्रक स्पेशलायझेशन असलेल्या विषयाचेच समुपदेशन व त्या प्रयोगशाळेत प्रात्यक्षिके घेवू शकतात. उदा. बी.एस्सी फिजिक्सचा संमंत्रक हा फक्त फिजिक्स करिताच समुपदेशन व प्रात्यक्षिके घेवू शकतात, त्यामुळे एखाद्या अभ्यासकेंद्रांकडे बी.एस्सी. फिजिक्स असल्यास त्यास अनुसरून तेथे बी.एस्सी. गणित देता येणार नाही, देण्याचे असल्यास तेथे स्वतंत्रपणे बी.एस्सी. गणित यासाठी त्यातील स्पेशलायझेशन असलेले समंत्रक व त्या विषयाची प्रयोगशाळा असणे अनिवार्य आहे. म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निकषांचे पालन करताना विज्ञान विद्याशाखेकरिता पारंपरिक विद्यापीठाच्या पदवी/पदव्युत्तर पातळी शिक्षणक्रमाची मान्यता असलेल्या शिक्षणक्रमांसाठी प्रत्येक विषयांची स्वतंत्र मान्यता गृहीत धरण्यात यावी. अशी वरील सुचविल्याप्रमाणे अहवालात सुधारणा करण्यात यावी ही विनंती.<br>तसेच अहवालातील विज्ञान विद्याशाखेच्या बाबतीतील दुसऱ्या मुद्यानुसार एम.एस्सी. शिक्षणक्रमांसाठी एखाद्या अभ्यासकेंद्रास बी.एस्सी.चे किमान ७ वर्षांपासून मान्यता असेल आणि त्या अभ्यासकेंद्राला/कॉलेजला २ वर्षांपूर्वी त्याच विषयाची (स्पेशलायझेशन) एम.एस्सी.ची मान्यता मिळाली असेल, म्हणजेच तेथे त्या स्पेशलायझेशन एम.एस्सी.ची १ बॅच उत्तीर्ण झाली असेल अश्या अभ्यासकेंद्राला मान्यता द्यावी. |

सुधारीत ठराव पुढीलप्रमाणे असावा.

सर्व विद्याशाखांमधील विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेल्या शिक्षणक्रमांसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निकषांनुसार अभ्यासकेंद्रे मान्यतेची कार्यवाही विद्यापीठ सेवा विभाग आणि विभागीय संचालक यांच्या मार्फत करण्यात यावी,

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निकषांचे पालन करताना विज्ञान विद्याशाखा वगळून इतर विद्याशाखांकरिता प्रत्येक विषय स्वतंत्र गृहीत न धरता पारंपरिक विद्यापीठाच्या एखादा पदवी/पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमाची मान्यता असलेल्या इतर समकक्ष शिक्षणक्रमांसाठी तीच मान्यता गृहीत धरण्यात यावी. उदाहरणार्थ, बी.ए.साठी एकच निकष लावून त्यात बी.ए. स्पेशलायझेशन बी.कॉम. साठी दिलेल्या अभ्यासक्रमांमध्ये बी. कॉम. स्पेशलायझेशन, परंतु विज्ञान विद्याशाखेच्या बी. एस्सी, फिजिक्सच्या अभ्यासक्रमाला बी.एस्सी. गणित तसेच बी. एस्सी. बॉटनी असल्यास बी. एस्सी. झुलॉजी इत्यादी अभ्यासक्रम देता येणार नाही, तसेच एम.एस्सी. शिक्षणक्रमांसाठी एखाद्या अभ्यासकेंद्रात बी.एस्सी.चे किमान 7 वर्षांपासून असेल आणि त्या अभ्यासकेंद्राला/ कॉलेजला 2 वर्षापूर्वी एम.एस्सी.ची मान्यता मिळाली असेल म्हणजेच तेथे एम.एस्सी.ची 1 बॅच उत्तीर्ण झाली असेल, अभ्यासकेंद्राला मान्यता द्यावी असे ठरले.

नवीन शिक्षणक्रमांसाठी दूरशिक्षण परिषदेचं PPR, PDF Forms पाठवून मान्यता द्यायची आहे. रुपये ४०,००० पेक्षा अधिक शुल्कासाठी वित्त समितीकडून मान्यता घ्यावी, सदर शुल्क रचना करताना अभ्यासकेंद्र प्रतिनिधी समिती घ्यावी किंवा अभ्यासकेंद्र प्रतिनिधींना अभिप्राय/मत विचारात घ्यावे, असे सुचित केले.

काही अभ्यासकेंद्रांविरुद्ध अनियमित/रिपोर्ट्समुळे विद्यापीठाची समाजातील प्रतिमा मलीन होणे यावर सद्यस्थितीत संवेदनशील अभ्यासकेंद्रांची यादी विभागीय केंद्रामार्फत मागविली जावी, असा अभ्यासकेंद्रांची पाहणी करून दोन्ही आठवड्यात अभ्यासकेंद्रे मान्यता रद्द करण्याची कार्यवाही करण्यात यावी असेही सुचित केले.

**ठराव** — शिक्षणक्रमांसाठी अभ्यासकेंद्र मान्यता देताना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या निकषांचे व मार्गदर्शक तत्वांचे पालन करण्यात यावे.

विज्ञान विद्याशाखेसाठी, ज्या महाविद्यालयात B.Sc. साठी ज्या Specilization ला पारंपरिक विद्यापीठाची मान्यता आहे असे पदवी शिक्षणक्रम कार्यरत आहेत/सुरू आहेत त्याच Specilization साठी त्या महाविद्यालयाला B.Sc. शिक्षणक्रमासाठी विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र निश्चित करण्यास मान्यता प्रदान करण्यात यावी.

एम.एस्सी. शिक्षणक्रमांसाठी एखाद्या अभ्यासकेंद्रास बी.एस्सी. चे किमान ७ वर्षांपासून मान्यता असेल आणि त्या अभ्यासकेंद्राला/कॉलेजला २ वर्षांपूर्वी त्याच विषयाची (स्पेशलायझेशन) एम.एस्सी. ची मान्यता मिळाली असेल, म्हणजेच तेथे त्या स्पेशलायझेशन एम.एस्सी.ची १ बॅच उत्तीर्ण झाली असेल अश्या

| | | |
|---|---|---|
| | | अभ्यासकेंद्राला मान्यता देण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 47.3.2<br>कृषी विज्ञान विद्याशाखा | **सन 2026-27 मध्ये कृषी विज्ञान विद्याशाखेमार्फत 'रेशीम उत्पादन प्रमाणपत्र' आणि 'रेशीम उत्पादन पदविका' हे दोन शिक्षणक्रम सुरू करण्यात येत आहेत. सदर सुरू करावयाच्या शिक्षणक्रमांना मा. नियोजन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** — कृषिविज्ञान विद्याशाखेअंतर्गत विविध अभ्यासकेंद्रांकडून 'रेशीम उत्पादन प्रमाणपत्र' आणि 'रेशीम उत्पादन पदविका' शिक्षणक्रम सुरू करण्याबाबत वारंवार मागणी प्राप्त होत होती. सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्यात अशाप्रकारचे सविस्तर शिक्षणक्रम उपलब्ध नाहीत. महाराष्ट्र राज्याच्या रेशीम संचालनाद्वारे देखील अशाप्रकारच्या शिक्षणक्रमाची आवश्यकता मांडली आहे. रेशीम उत्पादनाचे वाढते क्षेत्र लक्षात घेता सदर दोन्ही शिक्षणक्रमांमुळे कृषी पूरक उद्योग म्हणून तसेच ग्रामीण युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यास निश्चितच मदत होईल.<br>त्यानुसार रेशीम उत्पादन प्रमाणपत्र आणि रेशीम उत्पादन पदविका हे दोन शिक्षणक्रम विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मा. कुलगुरू यांच्या मान्यतेनुसार स्थापित करण्यात आलेल्या तज्ज्ञ सल्लागार समितीद्वारे (PAC) सदर दोन्ही शिक्षणक्रमांचा Syllabus अंतिम करण्यात आला आहे.<br>प्रस्ताव : सदर रेशीम उत्पादन प्रमाणपत्र आणि रेशीम उत्पादन पदविका हे दोन्ही प्रस्तावित शिक्षणक्रम नियोजन मंडळ मान्यतेस्तव सादर<br>**ठराव** — मा. संचालक, कृषी विज्ञान विद्याशाखा यांनी मांडलेल्या 'रेशीम उत्पादन प्रमाणपत्र' आणि 'रेशीम उत्पादन पदविका' शिक्षणक्रमाला सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. तसेच पदविका शिक्षणक्रमातील दोन क्रेडीटच्या अभ्यासक्रमांचा समावेश Open Basket मध्ये करण्यात यावा असेही सुचित करण्यात आले. |
| | 46.3.3<br>नियोजन कक्ष | **यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा 'Strategic Roadmap for Transforming YCMOU (Period 2025 to 2030) : Recommendations for Futuristic Transformation हा अहवाल तयार करण्यात आला आहे. सदरचा अहवाल चर्चेसाठी आणि मान्यतेसाठी मा. नियोजन मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** — यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा 'Strategic Roadmap for Transforming YCMOU (Period 2025 to 2030) : Recommendations for Futuristic Transformation हा अहवाल तयार करण्यात आला आहे. सदरचा अहवाल चर्चेसाठी आणि मान्यतेसाठी मा. नियोजन मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर...<br>**ठराव** — सदर अहवालाचे वाचन आणि त्यातील महत्त्वाच्या बाबींचे मा. कुलगुरूंनी विवेचन करून सदस्यांना अवगत करून दिले.<br>सादर केलेला अहवाल अतिशय स्तुत्य असल्याचे सांगून सर्व सन्माननीय सदस्यांनी मा. कुलगुरू आणि सदस्यांचे अभिनंदन केले. |

| | | |
|---|---|---|
| | | मा. कुलगुरूंनी सर्व सन्माननीय सदस्यांना "या अहवालाचे बारकाईने अवलोकन करावे तसेच आपले मत कळविण्याची विनंती केली. सदर अहवाल मा. राज्यपाल कार्यालयास 10 दिवसांत पाठविणार असल्याने आपले मत लवकरात लवकर पाठवावे म्हणजे त्याचा समावेश अहवालात करता येईल" अशी विनंती केली. |
| | 46.3.4<br>**वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा** | **वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत शैक्षणिक वर्ष 2025-26मध्ये पोर्ट मॅनेजमेंट संदर्भातील पाच शिक्षणक्रमांच्या अध्ययन साहित्य निर्मितीसाठी येणाऱ्या अंदाजे रु. पासष्ट लाख शहाण्णव हजार सहाशे पंचवीस इतक्या खर्चास नियोजन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर ...**<br>**टिपणी** — वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत पोर्ट मॅनेजमेंट विषयातील<br>(1) बीबीए पोर्ट मॅनेजमेंट - पदवी<br>(2) कस्टम क्लिअरन्स आणि फ्रेट डॉक्युमेंटेशन - पदविका<br>(3) वेअर हाऊसिंग अँड इन्वेंटरी मॅनेजमेंट — पदविका<br>(4) पोर्ट टर्मिनल ऑपरेशन्स मॅनेजमेंट — पदविका<br>(5) शिप चांडलींग अँड सप्लाय चेन सुपरवायझर — पदविका<br>या शिक्षणक्रमांच्या अध्ययन साहित्य निर्मितीस येणाऱ्या एकूण रुपये पासस्ट लाख शहाण्णव हजार सहाशे पंचवीस फक्त (रु. 65,96,625/-) इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा. नियोजन मंडळाच्या मान्यतेस सादर ...<br>**ठराव** — वरील विषयाला वित्त समितीत मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर बाब नियोजन मंडळाच्या अवलोकनार्थ तथा मान्यतेस्तव सादर करण्यात आली आहे. त्यास मान्यता देण्यात आली. |
| 46.4.0 | | **मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळेचे विषय** |
| | 46.4.1<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा | **'परसबाग' हा प्रमाणपत्र शिक्षणक्रम ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही पद्धतीद्वारे सुरू ठेवण्यासाठीचा प्रस्ताव नियोजन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर ...**<br>**टिपणी** — 'परसबाग' हा प्रमाणपत्र शिक्षणक्रम ऑफलाईन मोडद्वारे शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत ऑफलाईन राबविण्याचा तसेच ऑनलाईन पद्धतीने सध्या सुरू असलेला हाच शिक्षणक्रम डिजिटल एज्युकेशन विद्याशाखा व शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्याचा प्रस्ताव मा. नियोजन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर ...<br>**ठराव** — मा. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांनी मांडलेल्या 'परसबाग' हा प्रमाणपत्र शिक्षणक्रम 16 श्रेयांकांचा ऑफलाईन पद्धतीद्वारे शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत राबविण्याचा तसेच ऑनलाईन पद्धतीने सध्या सुरू असलेला हाच शिक्षणक्रम डिजिटल एज्युकेशन विद्याशाखा व शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्याचा प्रस्तावास मा. नियोजन मंडळाने तत्वत: मान्यता दिली.<br>यासाठी डिजिटल एज्युकेशन या विद्याशाखेशी समन्वय साधून दोन्ही विद्याशाखांनी मिळून एकत्रितरित्या राबविण्याची सुचना करण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | 46.4.2 ग्रामीण विकास व उद्योजकता विद्याशाखा | **ग्रामीण विकास व उद्योजकता विद्याशाखेमार्फत घनशेत ता. पेठ येथे "बांबू सामुदायिक विकास केंद्र" सुरू कर्यासंबंधीचा प्रस्ताव मा. नियोजन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर ...**<br>**टिपणी** – भारतामध्ये 'हिरवे सोने' म्हणून ओळखला जाणार बांबू हा पर्यावरणीय शाश्वतता, ग्रामीण उपजिवीका आणि हरीत अर्थव्यवस्थेचा कणा ठरत आहे. भारत जगातील दुसऱ्या क्रमांकाचा बांबू उत्पादक देश असून सुमारे 1.396 दशलक्ष हेक्टर क्षेत्रावर 136 पेक्षा अधिका बांबू प्रजाती आढळतात. बांबूचे महत्त्व ओळखून ग्रामीण व आदिवासी भागातील शाश्वत विकासासाठी पेठ येथे "बांबू सामुदायिक विकास केंद्र" उभारण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर...<br>**ठराव** – मा. संचालक, ग्रामीण विकास व उद्योजकता यांनी मांडलेला प्रस्ताव ग्रामीण व आदिवासी भागातील युवकांना रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने अत्यंत उपयोगी आहे असे मत मांडून या प्रस्तावास मा. नियोजन मंडळाने तत्वत: मान्यता दिली. |
| | | मा. कुलगुरूंनी विद्यापीठाच्या वाटचालीबाबत सर्व सन्माननीय सदस्यांना अवगत करून दिले.<br>महाराष्ट्र शासनाने 5 विद्यापीठांच्या कायद्यात सुधारणा करण्यासाठी एक समिती गठीत केली. सदर समितीमार्फत कायद्यातील सद्य तरतुदींमध्ये सुधारणा, नवीन तरतुदींचा समावेश आणि कालबद्ध झालेल्या तरतुदी वगळण्यासाठी विद्यापीठाने एक उपसमिती गठीत केली. उपसमितीने विद्यापीठाच्या कायद्याचा अभ्यास करून तसेच नवीन शैक्षणिक धोरण 2020 तरतुदी, शैक्षणिक आव्हाने यांना अनुसरून विद्यापीठाच्या कायद्यात सुधारणा करण्याचे काम अंतिम टप्प्यापर्यंत केले आहे. त्यामुळे लवकरच सुधारीत कायद्याची प्रत शासनाने गठीत समितीकडे मान्यतेसाठी पाठविण्यात येणार आहे. तसेच या तरतुदींवर आधारीत अध्यादेशही करण्याचे काम या समितीने केले आहे.<br>नियोजन मंडळाच्या मान्यतेने स्थापन केलेल्या ललित कला केंद्रामार्फत 'इथेच टाका तंबू' या प्रायोगिक नाट्याची निर्मिती करण्यात आली आहे. सदर नाटकाचे प्रयोग पुणे, मुंबई, ठाणे, नाशिक येथे झाले आहेत. या नाटकाच्या निर्मितीत तसेच नाटकात काम करण्यासाठी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या Certificate Programme in Early Identification and Intervention – A cross disability approach या शिक्षणक्रमास भारतीय पुनर्वास परिषदने मंजुरी दिली आहे. सदर शिक्षणक्रम जून 2026 पासून सुरू होत आहे.<br>विद्यापीठाच्या वाटचालीसाठी सर्व सन्माननीय सदस्यांनी आनंद व्यक्त करून मा. कुलगुरू आणि सर्वांचे अभिनंदन केले. |

**अध्यक्ष** **सदस्य सचिव**

**नियोजन मंडळ** **नियोजन मंडळ**